**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४००००१
दूरध्वनी क्र ०२२-२२८३०२०० **Email ID : soyoj6.rdd-mh@nic.in**

**क्रमांक: विकास-२०२४/प्र.क्र.११०/यो-६** **दिनांक : ०७ एप्रिल, २०२५**

**प्रति,**

१) मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व)

२) अधिक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ (सर्व).

**विषय :** लेखाशिर्ष २५१५-१२३८ व लेखाशिर्ष ३०५४-२४१९ अंतर्गत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील मंजूर कामांची देयके LPRS प्रणालीवर सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत.

**महोदय/महोदया,**

मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविणे (लेखाशिर्ष २५१५-१२३८) व जिल्हा परिषदेंतर्गत रस्ते व पूल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम (लेखाशिर्ष ३०५४-२४१९) या योजनांतर्गत अनुक्रमे गावातील मुलभुत विकास कामांना व ग्रामीण रस्ते/पूल दुरुस्ती कामांना शासन मान्यतेने मंजूरी दिली जाते.

२. सदर कामांची देयके अदा करण्यासाठी सन २०१९-२० पासून LPRS प्रणाली विकसित करण्यात आली आहे. सदर कामे पूर्ण करुन त्यांची देयके LPRS प्रणालीवर सादर करण्यासाठी कामे ज्या आर्थिक वर्षात मंजूर केले जातात, त्या आर्थिक वर्षाच्या लगतच्या पुढील आर्थिक वर्षापर्यंतच Upload करता येते. त्यानुसार सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामांची मुदत दि.३१ मार्च, २०२५ रोजी संपुष्टात आली आहे.

तथापि, सन २०२३-२४ मधील काही कामांची देयके स्थानिक, तांत्रिक अडचण, सन २०२४ मधील लोकसभा निवडणूक आदर्श आचारसंहिता कालावधी, विधानसभा निवडणूक आदर्श आचारसंहिता इ.मुळे शासनास विहीत मुदतीत प्राप्त होत नसल्यामुळे अशा कामांना मुदतवाढ देण्यासंबंधी क्षेत्रिय कार्यालयांकडून मागणी होत आहे.

३. त्यानुषंगाने, **सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील ज्या मंजूर कामांचे विहीत मुदतीत म्हणजेच दि.३१ मार्च, २०२५ पर्यंत कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत, केवळ अशाच कामांची देयके सादर करण्यास दि.३१ डिसेंबर, २०२५ पर्यंत** मुदतवाढ देण्यात

येत आहे. तरी जिल्हा परिषद व सार्वजनिक बांधकाम मंडळ यांनी विहीत मुदतीत सदर कामे पूर्ण करुन देयके LPRS प्रणालीवर दि.३१ डिसेंबर, २०२५ पर्यंत सादर करण्याची दक्षता घ्यावी.

आपला,

(का.गो.वळवी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी :-**

१) अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),

२) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),

३) कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद (सर्व),

४) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (सर्व).

**प्रत:-** कार्यासन अधिकारी (बांधकाम-३), ग्राम विकास विभाग